—:प्रेसनोट:— दिनांक २२/०८/२०२६

भारतीय सैन्याच्या आर्मी व्हेईकल निगम लिमीटेड (ए.व्ही.एन.एल.), जबलपुर येथील कार्यालयात भाडयाने वाहन लाऊन देते असे सांगुन फसवणुक करणाऱ्या महिलेस अटक करून दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई ने गुन्हा उघडकीस आणलेबाबत.

दिंडोशी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ३५२/२०२६ कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३७, ३३८, ३४०(२), ३(५) बि.एन.एस. अ‍ॅक्ट या गुन्ह्यातील फिर्यादी नामे श्री अजित सिंग यास अ‍ॅक्सिस बँक जबलपुर येथे नोकरीस असणारी आरोपी महिला नामे मोनालीकुमारी हिने मोबाईल वॉट्सअ‍ॅपव्दारे ए.व्ही.एन.एल. कार्यालयासाठी वेगवेगळया प्रकारची वाहणे भाडयाने पाहीजे असल्याबाबत बनावट जाहीरात पाठवली. त्यानंतर फिर्यादीस सदर जाहीरातीप्रमाणे ए.व्ही.एन.एल. कार्यालयात फिर्यादीचे नावे वाहण भाडयाने लावुन देण्याचे आश्वासन देवुन फिर्यादीकडुन जानेवारी २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत फसवणुकीने एकुन ३२,६३,०००/—रू (बत्तीस लाख त्रेसष्ठ हजार रूपये स्वत:चे बँक खात्यावर घेतले म्हणुन नमुद गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरच्या गुन्ह्याचा तांत्रीक तपास करून, बँक खात्यांची पडताळणी करून व मानवी कौशल्य वापरून सदरचा गुन्हा आरोपी मोनालीकुमारी हिनेच केला असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्ह्यात आरोपी मोनालीकुमारी हिस दिनांक १८/०८/२०२६ रोजी जबलपुर, मध्यप्रदेश येथुन अटक करण्यात आली आहे. सदर महिलेस अ‍ॅक्सिस बँकेतुन निलंबीत केल्याची माहिती प्राप्त झाली असुन तीने लोकांची इतर प्रकारे देखील फसवणुक केल्याने तीचेविरोधात जबलपुर येथे गुन्हे नोंद आहेत.

गुन्ह्याचे तपासामध्ये आरोपीच्या बँक खात्यावरून फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी २२,६४,५२४/— रू ( बावीस लाख चौसष्ठ हजार पाचशे चोवीस रू) व गुन्हा करण्यासाठी वापरलेला मोबाईल, सिमकार्ड अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री डॉ. मनोज शर्मा, पोलीस सह आयुक्त ( का. व सु. ) बृहन्मुंबई, मा. श्री अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशीक विभाग, मुंबई. मा. श्री गजानन राजमाने, पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ ३, मुंबई. व मा. श्री विजय भिसे, सहा. पोलीस आयुक्त, दिंडोशी विभाग, मुंबई याचे मार्गदर्शनाखाली दिंडोशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री महेंद्र शिंदे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) श्री शरद सुर्वे, सहा. पोलिस निरीक्षक अमित खुटवड, पो.शि. श्री अमोल पाटील, म.पो.शि. मेघना भालेराव यांनी पार पाडली आहे.

........................

Scanned with CamScanner